
आज आपल्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन होत आहे



निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....

# दैनिक निशस्त्र योध्दा

निशस्त्र योध्दा मराठी — आवाज तुमचा, लढा आमचा!

मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com

मेहकर | सोमवार । १४ सप्टेंबर २०२६ । वर्ष-पहिले । अंक क्र. १७८ । पृष्ठे-४ । किंमत-४ रू. बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द


## मुख्यमंत्री राज्य अस्थिर करायचं काम करतायेत, मनोज जरांगे पाटील आक्रमक; पाणी, औषधोपचार सोडले

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**जालना :** मुंबईतील आंदोलनासाठी परवानगी नाकारण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. आम्ही संविधानाप्रमाणे चालतो. सरकारने कायदा पायदळी तुडवला तर न्यायालय न्याय देते. आम्ही सरकारच्या नियमांशी बांधील नाही आणि सरकारचे नियम आम्ही मानत नाही, असा आक्रमक पवित्रा जरांगे पाटील यांनी घेतला आहे.

मुंबईत आंदोलन करण्यासंदर्भात न्यायालयाने भूमिका स्पष्ट केली असतानाही आंदोलनाची परवानगी नाकारण्यात आल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला. द्वेष भावनेने परवानगी नाकारली आहे. मुंबईत आम्ही आंदोलन करू शकतो, असे न्यायालय म्हणत असताना यातून द्वेष उफाळून येत आहे, असे ते म्हणाले.

गेल्या वर्षीही गणेशोत्सवाच्या काळात आंदोलन झाले होते, याची आठवण करून



देत जरांगे पाटील म्हणाले की, त्यावेळी आम्ही शांततेत आंदोलन केले होते. यंदाही गणेशोत्सवाची मिरवणूक ठरल्याप्रमाणे होईल आणि आम्हीही ठरल्याप्रमाणे उपोषण करणार आहोत.

आमचे वकील आजपासून कामाला लागतील - परवानगी नाकारल्याच्या निर्णयाविरोधात कायदेशीर लढाईची तयारी सुरू केल्याचे जरांगे पाटील यांनी सांगितले. आमचे वकील आजपासून कामाला लागतील. पोलीस आयुक्तांकडे जायचे की आणखी कायदेशीर मार्ग अवलंबायचा, हे वकील ठरवतील, असे त्यांनी स्पष्ट केले. पोलीस प्रशासनावरही त्यांनी गंभीर आरोप केले. पोलीस निरीक्षकांनी कायदा पायाखाली तुडवला आहे. सोयीनुसार कायदा चालवता येणार नाही,अशी टीका जरांगे यांनी केली.

हुकूमशाही आणि गुंडगिरी आम्हाला मान्य नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही मनोज जरांगे पाटील यांनी निशाणा साधला. राज्य अस्थिर करण्याचे काम मुख्यमंत्री करत आहेत. गेल्या वर्षी कायदा नव्हता का? हे नवीन कायदा चालवणारे झाले का?‘ असा सवाल त्यांनी उपस्थित केला.


फडणवीस यांना न्यायदेवतेसह सगळ्यांचा अवमान करायचा आहे. राज्य दूषित करायचे आहे. आम्ही आदेश पाळून आंदोलन करणार आहोत. ही हुकूमशाही आणि गुंडगिरी आहे. मी तुम्हाला शरण येणार नाही, गुडघे टेकणार नाही. आडमुठ्या सरकारचे धोरण आम्हाला मान्य नाही, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला.

आजपासून पाणी आणि औषधोपचारही बंद करतो - परवानगी नाकारल्याच्या निर्णयामुळे आपला उपोषणाचा निर्धार आणखी तीव्र झाल्याचे सांगत जरांगे यांनी गंभीर इशारा दिला. तुम्ही असं करणार असाल तर आजपासून पाणी आणि औषधोपचारदेखील मी बंद करत आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, राज्य अस्थिर करण्याची गरज आम्हाला नसून सरकारच तसे करत असल्याचा आरोप जरांगे यांनी केला. राज्य तुम्हाला अस्थिर करायचे आहे, आम्हाला नाही. या सगळ्या गोष्टीला फडणवीस जबाबदार आहेत, असा थेट आरोप त्यांनी केला.

मुंबई आंदोलनाच्या परवानगीचा मुद्दा आता न्यायालयीन मार्गाने नेला जाण्याची शक्यता असून, जरांगे पाटील यांच्या पुढील भूमिकेकडे राज्याचे लक्ष लागले आहे.


## भारतानं ब्रिक्सच्या माध्यमातून मैत्री, भागीदारी आणि सहकार्याची भावना दृढ केली - पंतप्रधान मोदी




नवी दिल्ली - १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेचा रविवारी दुसरा दिवस आहे. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिक्स शिखर परिषदेला संबोधित करत विविध मुद्द्यांवर भारताची भूमिका स्पष्ट केली. ब्रिक्स शिखर परिषदेसाठी जगातील अनेक देशांचे प्रमुख दिल्लीत दाखल झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नमूद केले की, ब्रिक्स मधील ग्लोबल साउथ (विकसनशील) देशांचा विश्वास वाढला आहे. त्यांनी या ११ देशांच्या गटाद्वारे आपत्ती व्यवस्थापन, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील सहकार्य आणि पर्यावरण यांसारख्या महत्त्वाच्या उपक्रमांवर प्रकाश टाकला. १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या दुसऱ्या दिवशी लवचिकता, नाविन्य, सहकार्य आणि शाश्वतता: सर्वसमावेशक जागतिक विकासासाठी भविष्याची जडणघडण या विषयावरील सत्राचे अध्यक्षपद भूषवताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ‘‘भारताने ब्रिक्स मंचाच्या माध्यमातून मैत्री, भागीदारी आणि सहकार्याची भावना अधिक दृढ केली आहे.ते म्हणाले, ब्रिक्समधील सहकार्य केवळ सरकारांपुरतेच मर्यादित राहू नये, यासाठी आम्ही प्रयत्न केले आहेत; आम्हाला असे वाटते की आमचे उद्योजक, शेतकरी, संशोधक, महिला, युवा आणि सामान्य नागरिक यांनीही यात सक्रिय सहभाग घ्यावा.

त्यांनी पुढे सांगितले, मी माझ्या वैयक्तिक अनुभवावरून सांगू शकतो की, ब्रिक्समधील ग्लोबल साउथ देशांचा विश्वास वाढला आहे; कारण त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाते, त्यांच्या अनुभवांचा आदर केला जातो आणि त्यांच्यासाठी केवळ उपाययोजनाच केल्या जात नाहीत, तर त्या त्यांच्या सहभागातूनच तयार केल्या जातात. आमची विविधता आणि सहकार्य हीच ब्रिक्सची खरी ताकद आहे. आपली पार्श्वभूमी आणि वास्तव भिन्न असू शकते, परंतु सहकार्याच्या बळावर आपण एकत्रितपणे प्रगती करतो आणि मानवतेच्या कल्याणासाठी बहरतो. आपली विविधता हीच आपली ओळख बनो, आपले सहकार्य हीच आपली प्रेरणा ठरो आणि आपल्या प्रगतीचा लाभ संपूर्ण मानवजातीला मिळो.

## महायुतीत वाद शिगेला! वादग्रस्त विधानावरून शिवसेना आ. संजय गायकवाड यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** जिल्ह्यातील महायुतीमधील अंतर्गत राजकीय वाद आता पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला आहे. शिवसेना आमदार संजय गायकवाड आणि चिखलीच्या भाजप आमदार श्वेता महाले यांच्यातील तणाव तीव्र झाला आहे. अशातच आमदार गायकवाड यांच्या एका वादग्रस्त वक्तव्यावरून महिला सामाजिक कार्यकर्त्या सविता भगवान बेंडवाल यांनी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम ७९ अंतर्गत आमदार संजय गायकवाड यांच्यावर मध्यरात्री गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

काय होते वादग्रस्त वक्तव्य- प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, भाजपा आमदार श्वेता महाले यांचे पती तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले यांचा वाढदिवस बुलढाणा शहरात मोठ्या थाटात साजरा झाला. यावेळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत ''बाप तो बाप रहेगा'' हे गाणे वाजवण्यात आलं. माध्यमांनी आमदार संजय गायकवाड यांची प्रतिक्रिया घेतली असता त्यांनी म्हटलं होतं की, ''बाप तो बाप रहेगा हे माणसाने बोलले तर चालेल, पण एखाद्या बाईनं बाप असल्याचं सांगितलं तर बापासारखे शरीर कुठून आणणार?'' हे विधान सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला.

संतोष पंडित प्रकरणात अशीच कारवाई झाल्याचा दावा- सामाजिक कार्यकर्ता सविता भगवान बेंडवाल यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, आमदार गायकवाड यांचे हे वक्तव्य महिलेच्या शरीरावरून केलेली टीका आहे. त्यामुळे महिलांच्या लज्जेला धक्का पोहोचला आहे. शब्दांनी, हावभावांनी किंवा इशाऱ्यांनी महिलेला अपमानित करणे हा विनयभंगाचा प्रकार असल्याचे सांगत त्यांनी तक्रार दाखल केली. पोलिसांनी त्वरित कारवाई करत गुन्हा नोंदवला. यापूर्वी पुण्यातील कोथरूड पोलीस ठाण्यात संतोष पंडित प्रकरणातही अशीच कारवाई झाली होती, असा उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे.

दोन्ही आमदारांमधील संघर्षाचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यात - महायुतीमधील दोन घटक पक्षांमधील हा वाद आता पूर्णपणे उघड झाला आहे. आमदार श्वेता महाले यांनी यापूर्वीही आमदार गायकवाड यांच्यावर टीका केली होती, तर गायकवाड यांनीही प्रत्युत्तर दिले होते. आता हे प्रकरण कायदेशीर मार्गाने पुढे जाते की पक्षश्रेष्ठी हस्तक्षेप करून शमवतात, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल. बुलढाण्यातील राजकीय वातावरण तापले असून दोन्ही आमदारांमधील संघर्षाचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यात उमटत आहेत.

## २४० हून अधिक प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या जहाजाचा संपर्क तुटला; इंडोनेशियात शोधमोहीम सुरू

जकार्ता : इंडोनेशियात २४० हून अधिक प्रवाशांना घेऊन पूर्व जावाहून दक्षिण कालीमंतनकडे निघालेल्या एका प्रवासी जहाजाचा जावा समुद्रात अचानक संपर्क तुटला आहे.या घटनेनंतर इंडोनेशियातील बचाव पथकांनी रविवारी सकाळपासून जहाजाचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. जहाजामध्ये २४१ प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

’व्हर्गो ट्रान्सपोर्ट ८’ हे जहाज पूर्व जावा प्रांतातील सुराबाया शहरातून दक्षिण कालीमंतनमधील बंजारमासिनकडे रवाना झाले होते. रविवारी पहाटे सुमारे २ वाजता जहाजाशी संपर्क तुटला. त्यानंतर सुमारे दोन तासांनी संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत माहिती मिळाली.

जहाज खराब हवामानात अडकल्याची माहिती ऑपरेटरकडून मिळाल्यानंतर शोध




आणि बचाव यंत्रणांना सतर्क करण्यात आले. बंजारमासिन येथील शोध आणि बचाव कार्यालयाचे प्रमुख आय पुटू सुदयाना यांनी दिलेल्या माहितीनुसार, जहाजाचे शेवटचे ज्ञात स्थान बंजारमासिन येथील धक्क्यापासून सुमारे १४८ किलोमीटर अंतरावर जावा समुद्रात असल्याचे समोर आले आहे.

जहाजाच्या प्रवासी यादीत २४१ प्रवाशांची नोंद असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. मात्र, या घटनेत आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

जहाजाची ऑपरेटर कंपनी व्हर्गो योएल रिहीने दिलेल्या माहितीनुसार, हे जहाज शनिवारी सकाळी १०:१३ वाजता सुराबाया येथून बंजारमासिनच्या दिशेने रवाना झाले होते. मात्र, प्रवासादरम्यान त्याच्याशी संपर्क तुटला.

घटनेची माहिती मिळताच बंजारमासिनच्या बसिरीह शोध आणि बचाव धक्क्यावरून पथक रवाना करण्यात आले. तसेच जहाजाचे शेवटचे ज्ञात ठिकाण लक्षात घेऊन बचाव नौकाही त्या दिशेने पाठवण्यात आली आहे.

जहाजात मोठ्या संख्येने प्रवासी आणि कर्मचारी असल्याने शोधमोहीम अधिक वेगाने राबवण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ आणि संसाधने एकत्र करण्यात येत आहेत. इंडोनेशियाची शोध आणि बचाव यंत्रणा सागरी अधिकारी तसेच इतर संबंधित संस्थांच्या मदतीने ही मोहीम राबवत आहे. खराब हवामानामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याने समुद्रातील परिस्थितीवरही सतत लक्ष ठेवले जात आहे.

## पाचगणीमधून लष्कर-ए-तोयबाशी संबंधित व्यक्तीस अटक; मुंबई गुन्हे शाखेची कारवाई

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सातारा :** मुंबईतील एका व्यावसायिकाला धमक्या दिल्याप्रकरणी पाचगणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोहम्मद शफीक मोहम्मद अकबर लोन या ३९ वर्षीय व्यक्तीला मुंबई गुन्हे शाखेने अटक केली आहे. या कारवाईत आरोपीचे पाकिस्तानमधील प्रतिबंधित दहशतवादी संघटना ’लष्कर-ए-तोयबा’शी थेट संबंध असल्याचे उघड झाले आहेत. आरोपीचा भाऊ याच संघटनेत कमांडर आहे. आरोपीने सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानी हँडलरशी संपर्क साधून धमक्या दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी त्याच्याकडून दोन मोबाईल व एक डायरी जप्त केली असून, या रॅकेटमधील अन्य सहकाऱ्यांचा कसून शोध घेतला जात आहे.



मुंबई क्राईम ब्रँचकडून ३९ वर्षीय मोहम्मद शफीक मोहम्मद अकबर लोन याला अटक केली आहे. मुंबईतील एका व्यावसायिकाला धमकी दिल्याप्रकरणी कारवाई मुंबई गुन्हे शाखेनं ही कारवाई केली आहे. पाचगणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

आरोपीचे पाकिस्तानातील प्रतिबंधित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाशी थेट संबंध असल्याचा तपासात दावा करण्यात आला आहे.

आरोपीचा भाऊ लष्कर-ए-तोयबामध्ये कमांडर असल्याची माहिती समोर आली आहे.सोशल मीडियाच्या माध्यमातून तो पाकिस्तानी हँडलरच्या संपर्कात आल्याचा संशय आहे. पाकिस्तानी हँडलरशी संपर्क साधून व्यावसायिकाला धमकी दिल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे. पोलिसांनी आरोपीकडून दोन मोबाईल आणि एक डायरी जप्त केली आहे. या प्रकरणातील इतर संशयितांचा क्राईम ब्रँचकडून शोध सुरू आहे.

## सीमांचल एक्सप्रेसमध्ये काळीज पिळवटून टाकणारी घटना! ट्रेनमधून ९ महिन्यांचं बाळ पडलं; २३ तासांनी सापडला मृतदेह

नवी दिल्ली ‘ दिल्लीतील आनंद विहारहून बिहारच्या दिशेने निघालेल्या सीमांचल एक्सप्रेसमध्ये हृदयद्रावक घटना घडली. ट्रेनमधून प्रवास करत असताना ९ महिन्यांचं बाळ प्रयागराजजवळ आपत्कालीन खिडकीतून रेल्वे रुळांवर पडलं. तब्बल २३ तासांच्या शोधमोहिमेनंतर फैजुल्लापूर स्टेशनजवळील झुडपांमध्ये त्याचा छिन्नविछिन्न मृतदेह आढळून आला. खगरिया जिल्ह्यातील रहिवासी मोहन कुमार हे पत्नी काजल आणि आपल्या ९ महिन्यांच्या मुलासह सीमांचल एक्सप्रेसच्या एस-१ डब्यातून प्रवास करत होते. पहाटे सुमारे ४.१७ वाजता मोहन यांच्या लक्षात मुलगा जागेवर नसल्याचं आलं. त्याचवेळी आपत्कालीन खिडकी उघडी असल्याचंही दिसून आलं. त्यामुळे मुलगा ट्रेनमधून खाली पडल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. दाम्पत्याने तातडीने ट्रेनची साखळी ओढण्याचा प्रयत्न केला; मात्र जंगलाचा परिसर असल्याचं सांगत काही प्रवाशांनी त्यांना रोखल्याचा दावा आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली. जीआरपी आणि जीआरपीएफच्या पथकांनी रात्रभर शोध घेतला, तर शनिवारी नागरी पोलिसांचीही मदत घेण्यात आली. अखेर घटनेनंतर सुमारे २३ तासांनी मुलाचा मृतदेह फैजुल्लापूर स्टेशनजवळ सापडला.

## मेहकरच्या विकासाला २०० लक्षांची बळकटी!

### आमदार सिद्धार्थ खरात यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मेहकर** : मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून तब्बल २०० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाल्याने मतदारसंघातील विविध विकासकामांना मोठी गती मिळणार आहे.

दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. या निधीतून संविधान भवन, बुद्ध विहार, सभामंडप, स्मशानभूमी विकास, अंतर्गत रस्ते, पेव्हर ब्लॉक तसेच इतर मूलभूत सुविधांची कामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी प्रलंबित असलेल्या विकासकामांना चालना मिळण्यासोबतच नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्येही सुधारणा होणार आहे.

या निधीच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक आणि पायाभूत सुविधांचा विकास साधण्यावर भर देण्यात आला आहे. संविधान भवन व बुद्ध विहारांसारख्या सुविधांमुळे सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना बळ मिळणार असून, सभामंडप, स्मशानभूमी विकास, अंतर्गत रस्ते आणि पेव्हर ब्लॉक यांसारख्या कामांमुळे नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित सुविधा अधिक सक्षम होणार आहेत.

दरम्यान, माझ्यासाठी माझ्या मतदारसंघातला प्रत्येक घटक, प्रत्येक समाज हा महत्त्वाचा आहे आणि या विकासासाठी, या सर्वांसाठी मी कटिबद्ध आहे,'' ही आमदार सिद्धार्थ खरात यांची भूमिका या निधी मंजुरीतून अधोरेखित होत आहे. मतदारसंघातील कोणताही घटक विकासापासून वंचित राहू नये, प्रत्येक समाजाला विकासाच्या प्रवाहात समान स्थान मिळावे आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य मिळावे, या व्यापक भूमिकेतून विकासकामांचा पाठपुरावा केला जात असल्याचे चित्र आहे. मतदारसंघातील विविध



विकासकामांसाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्यातून सामाजिक न्याय विभागाकडून २०० लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला असून, हा निधी सामाजिक विकासासोबतच पायाभूत सुविधांना आर्थिक बळ देणारा ठरणार आहे. मंजूर निधीमुळे मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघातील विकासकामांना गती मिळण्यासोबतच सर्व समाज, सर्व घटक आणि सर्वसामान्य नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. त्यामुळे या निधी मंजुरीकडे मतदारसंघाच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

## भारतीय सामर्थ्याचे जागतिक दर्शन

'ब्रिक्स'च्या व्यासपीठावर भारताने आपली कूटनीतिक ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला आहे असे नाही, तर बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेतील आपली भूमिकाही स्पष्ट केली आहे. अर्थव्यवस्था, स्टार्टअप, तंत्रज्ञान, डिजिटल व्यवस्था आणि 'ग्लोबल साऊथ'च्या आकांक्षांना दिशा देण्याचे 'ब्रिक्स'च्या व्यासपीठावरुन आवाहन करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय सामर्थ्याचे जागतिक दर्शन घडविले आहे. 'ब्रिक्सची व्याप्ती गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. आज हा समूह 'उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा मंच' इतकाच मर्यादित राहिलेला नाही, तर जागतिक अर्थव्यवस्था, व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, वित्त आणि 'ग्लोबल साऊथ'च्या राजकीय आकांक्षांवर प्रभाव टाकण्याची क्षमता या समूहाने निर्माण केली आहे. अशा वेळी भारताचे चौथ्यांदा अध्यक्षपद स्वीकारणे अतिशय महत्त्वाचे ठरते. भारताने अध्यक्षपदासाठी 'बिल्डिंग फॉर रेझिलियन्स', 'इनोव्हेशन', 'को-ऑपरेशन ॲण्ड सस्टेनेबिलिटी' हा मूलमंत्र निवडला आहे. वर्षभर झालेल्या व्यापार, उद्योग, डिजिटल तंत्रज्ञान, आरोग्य, विज्ञान, शेती, पर्यावरण आणि युवकांशी संबंधित बैठकींतून या चारही संकल्पनांना प्रत्यक्ष सहकार्याची दिशा देण्याचा यातून प्रयत्न झाला. म्हणजेच, शिखर परिषद दोन दिवसांची असली, तरी अध्यक्षपदाची प्रक्रिया वर्षभर चालते. तिच्यातून निर्माण होणारे नेटवर्क, प्रस्ताव आणि सहकार्याचे मार्ग हेच प्रत्यक्षफलित ठरू शकतात. तरीही 'ब्रिक्स'चे महत्त्व सदस्यदेशांच्या संख्येत किंवा संयुक्त घोषणांमध्ये नाही. या व्यासपीठाच्या माध्यमातून भारताला व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि नवोन्मेषाच्या नव्या शयता खुल्या करता येतात. त्याहून महत्त्वाचे म्हणजे भारतीय स्टार्टअप, डिजिटल व्यवस्था आणि विकासाचा अनुभव 'ग्लोबल साऊथ'समोर मांडून भारत नेतृत्वाची नवी भूमिका स्वीकारत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ब्रिक्स'च्या व्यासपीठावर भारताकडे पाहण्याची दृष्टीच बदलण्याचा प्रयत्न केला. भारत ही निव्वळ मोठी लोकसंख्या असलेली बाजारपेठ नाही; तर ती उत्पादन, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषासाठी जागतिक संधींचे केंद्र आहे, हा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेचा झालेला विस्तार, तरुण उद्योजकांची वाढती क्षमता आणि तंत्रज्ञानाच्या आधारे नव्या अर्थव्यवस्थेची उभारणी, याकडेही त्यांनी 'ब्रिस' देशांचे लक्ष वेधले. भारताने 'ब्रिक्स इनयुबेटर नेटवर्क' आणि 'ब्रिक्स स्टार्टअप इनोव्हेशन फंड'सारख्या संकल्पना पुढे केल्या आहेत. 'एमएसएमई' क्षेत्राचे झालेले आंतरराष्ट्रीयीकरण, व्यापार वित्ताची उपलब्धता आणि डिजिटल सेवांचा सीमापार विस्तार यांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. याचा अर्थ तितकाच महत्त्वाचा आहे. 'ब्रिक्स'ची चर्चा सरकारे आणि राष्ट्रप्रमुखांपुरती मर्यादित न ठेवता, ती उद्योजक, स्टार्टअप, संशोधक आणि नव्या पिढीच्या अर्थव्यवस्थेपर्यंत नेण्याचा भारताचा प्रयत्न आहे. याच संदर्भात भारताची 'डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रचर' जगासमोर सादर करण्याची संधी भारताला मिळाली. 'यूपीआय'सारखी व्यवस्था ही भारतातील डिजिटल व्यवहार सुलभ करणारी यंत्रणा राहिलेली नाही, तर ती विकसनशील देशांसाठी डिजिटल समावेशनाचे एक मॉडेल ठरणार आहे. भारताने 'ब्रिक्स'च्या डिजिटल अजेंड्यात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स', सायबर सुरक्षा, पुढील पिढीच्या 'नेटवर्क' तंत्रज्ञानाबरोबरच स्टार्टअप आणि डिजिटल कौशल्यांना स्थान दिले आहे. भारताचा अनुभव इतर देशांसाठी उपयोगी ठरू शकतो आणि त्याच वेळी इतर देशांच्या अनुभवातून भारतालाही शिकता येते. सहकार्याचा अर्थ हा कधीही एकतर्फी नसतो. अनुभवांची देवाणघेवाण आणि परस्पर क्षमतांची सांगड ही त्याची खरी ताकद असते. त्यामुळे भारत 'ब्रिक्स'मध्ये काही मागण्यासाठी नाही; तर स्वतःचे यशस्वी मॉडेल मांडण्यासाठीही उभा आहे, असे आज ठामपणे म्हणता येते. आगामी जागतिक अर्थव्यवस्थेतील स्पर्धेचे स्वरूपही भारताने 'ब्रिस'च्या चर्चेत पुढे आणले आहे. 'सेमीकंडटर', 'क्वांटम' तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स', 'क्रिटिकल मिनरल्स' आणि 'रेझिलियंट सप्लाय चेन्स' ही पुढील दशकातील आर्थिक शक्तीची साधने आहेत. उत्पादन वाढवून चालणार नाही. त्यासाठी कच्चा माल, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ, सुरक्षित पुरवठा साखळी आणि बाजारपेठ यांचे परस्पर सहकार्यही आवश्यक असेच. आज एखाद्या देशाची आर्थिक ताकद त्याच्या कारखान्यांच्या संख्येनेच ठरत नाही; तर त्याला आवश्यक असलेले तंत्रज्ञान आणि कच्चा माल संकटाच्या काळात उपलब्ध राहतील का, यावरही ठरते. त्यामुळे 'क्रिटिकल मिनरल्स'पासून 'एआय'पर्यंतच्या क्षेत्रांत 'ब्रिस' सहकार्याला धोरणात्मक महत्त्व प्राप्त होते. 'ग्लोबल साऊथ' हा भारताच्या भूमिकेचा महत्त्वाचा धागा. 'ब्रिक्स'चा अर्थ, 'पश्चिमेविरोधी आघाडी' असा भारताचा कधीही आग्रह नव्हता. जागतिक संस्थांमध्ये विकसनशील देशांचा आवाज अधिक प्रभावी व्हावा, व्यापार व्यवस्था अधिक न्याय्य व्हावी आणि विकासासाठी वित्त, तंत्रज्ञान व बाजारपेठांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, हा भारताचा दृष्टिकोन! विविध आर्थिक रचना, वेगवेगळे विकासमार्ग आणि भिन्न राजकीय अनुभव असलेल्या देशांना एका व्यासपीठावर आणून त्यांच्यात व्यवहार्य सहकार्य निर्माण करणे, हेच 'ब्रिस'समोरचे खरे आव्हान आहे. विस्तारामुळे समूहाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर वजन वाढले आहे; पण त्याचबरोबर मतभिन्नताही वाढल्या आहेत. त्यामुळे सर्व देशांना मान्य होतील, असे व्यवहार्य मुद्दे पुढे नेण्याची भारताची अध्यक्षपदाची भूमिका अधिक कसोटीची ठरते. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनीही 'ब्रिस'च्या विविधतेकडे काल आपल्या भाणषातून लक्ष वेधले आहे. प्रत्येक सदस्य देशाची विकासाची स्वतःची वाट, आर्थिक मॉडेल आणि ऐतिहासिक-सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहेत. या विविधतेला अडथळा न मानता सहकार्याची ताकद बनवणे, हे 'ब्रिक्स'समोरचे मोठे काम आहे. पंतप्रधान मोदी यांच्या भाषणातून भारताची आर्थिक आणि तांत्रिक क्षमता पुढे येते, तर पुतीन यांच्या भूमिकेतून विविध देशांना एका चौकटीत आणण्याचे आव्हानही स्पष्ट होते. या दोन भूमिकांचा संगमच 'ब्रिक्स'ला अधिक परिणामकारक बनवू शकतो. मोदी-पुतीन भेट ही याच व्यापक चित्राची महत्त्वाची बाजू आहेत. 'ब्रिक्स'च्या शिखर परिषदेच्या निमित्ताने होणाऱ्या द्विपक्षीय भेटी हे या व्यासपीठाचे अतिरिक्त सामर्थ्य आहे, असे म्हणता येईल. व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान, संरक्षण किंवा 'कनेटिव्हिटी' अशा क्षेत्रांतील चर्चा सामूहिक व्यासपीठाला प्रत्यक्ष आर्थिक परिणामांशी जोडतात. त्यामुळे 'ब्रिक्स'चा लाभ मोजताना, अंतिम घोषणापत्रात किती निर्णय झाले, एवढाच हिशोब पुरेसा नाही. एका छताखाली अनेक देशांचे नेतृत्व, उद्योग, गुंतवणूकदार आणि धोरणकर्ते एकत्र येतात, ही स्वतःमध्ये मोठी कूटनीतिक आणि आर्थिक संधी आहे. भारताने २०२३च्या 'जी-२०' अध्यक्षपदात या क्षमतेचे दर्शन घडवले होते. भारतात जगाला आणणे आणि त्यातून भारतासाठी संधी निर्माण करणे, ही आयोजनाची खरी कसोटी आहे.

# पत्रतपस्वी ग्रंथप्रकाशन म्हणजे पितृभक्तीचा अविस्मरणीय सोहळा : अजीम नवाज राही

## विदर्भ न्यायने घेतली प्रयोगशील विद्यार्थ्यांची नोंद, कुशाग्र विद्यार्थ्यांचा सन्मान : मान्यवरांच्या मांदियाळीत पार पडला पत्रतपस्वी ग्रंथ विमोचनाचा यादगार सोहळा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**साखरखेर्डा :** बाप ज्या वाटेवरचा वाटसरू असतो त्याच वाटेवरचा वाटसरू मुलगा होईल याची शाश्वती नसते. बापाने डेरेदार केलेल्या अनेक परंपरा मुलांनी सैरभैर केल्याची अनेक उदाहरणे आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्व. भोजराज गाडेकर यांनी ग्रामीण पत्रकारितेला स्वतःला वाहून घेतले. विदर्भ न्यायच्या माध्यमातून ग्रामीण पत्रकारितेचा एक वटवृक्ष त्याचे संवर्धन, संगोपन स्व. भोजराज गाडेकर यांच्या स्मरणाची परंपरा पत्रतपस्वी या ग्रंथप्रकाशनाच्या माध्यमातून पुढे नेण्याचे सश्रद्ध द्योतक आहे. पत्रकार वडिलांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त पाच पत्रकारांना उत्कृष्ट कार्यगौरव पत्रकारिता देऊन विदर्भ न्यायने भोजराज गाडेकर यांच्या मनातील श्रद्धांजली अर्पित केली आहे. असे गौरवोद्गार प्रख्यात मराठी कवी अजीम नवाज राही यांनी काढले.

शनिवार दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी पत्रतपस्वी स्व भोजराज नरहरी गाडेकर यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त पलसिध्द महास्वामी मठाच्या सभागृहात आयोजित पुरस्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तथा पत्रतपस्वी ग्रंथप्रकाशन निमित्त ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ठाणेदार युवराज रबडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मठाधिपती सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज, प्राचार्य डॉ. निलेश गावंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिलीपराव बेंडमाळी, माजी पंचायत समिती उपसभापती सुनील जगताप, सरपंचपती अमित जाधव, ॲड. अश्विनी सावजी, ॲड. निशिकांतराजे जाधव, जगदेव मराठे, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक नागरे, नंदकिशोर शिंगणे, लोकजागरचे प्रविण गीते, मॅथ्स कोचिंग क्लासेसचे संचालक शिवशंकर डुकरे पाटील, गोपाल मानतकर, प्रा दिलीप नाईकवाड, क्षितीत दर्जे, सूतगिरणीचे कार्यकारी संचालक बबनराव लोढे, सैय्यद रफीक, आयुबसेठ कुरेशी, भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य रावसाहेब देशपांडे, यशराज ग्राफीक्सचे डिझायनर नारायण भोलवणकर, ग्रामपंचायत सदस्य संदीप खिल्लारे, माजी सरपंच दाऊत कुरेशी, रमेश ठोसरे, मुख्याध्यापक विष्णू ठोसरे, पत्रकार डि एन पंचाळ, अशोक इंगळे, सचिन खंडारे, गजानन सरकटे, रवी वाघ, मनोज जाधव, संजय आंभोरे हे उपस्थित होते. प्रारंभी श्रीमज्जगद्गुरु पलसिध्द महास्वामी यांनी पत्रतपस्वी स्व भोजराज नरहरी गाडेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून समईप्रज्वलन केले. तदनंतर पत्रतपस्वी ग्रंथाच्या डिजीटल कव्हरपेजचे रिबीन कापून विमोचन करण्यात आले. दरम्यान दीपक आखरे, ज्ञानेश्वर राहाटे यांच्या स्वागत गीतांच्या स्वर लहरींनी मान्यवरांवर वर्षाव केला.

प्रारंभापासून समारोपापर्यंत या भावनिक कार्यक्रमाच्या ओलाव्याने उपस्थितांच्या अंतःकरणाची पकड घेतली.

दरम्यान पाच पत्रकारांना मानचिन्ह, स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तद्नंतर दहावी, बारावीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. राजुरेश्वर ज्वेलर्सच्या वतीने ह्या विद्यार्थ्यांना वृक्षभेट देऊन पर्यावरणाचा संदेश देण्यात आला.

आपल्या ओघवत्या भाषणात राही पुढे म्हणाले की, कामाला मालमत्तेचा, संपत्तीचा हेवा असतो भोजराजभाऊंची भक्ती शब्दांवर होती. शब्दांच्या प्रेमाखातर त्यांनी अख्खं आयुष्य ग्रामीण पत्रकारितेला समर्पित केलं. वर्तमानयुग हे डिजिटल युग आहे सुविधांची गडगंज आयुधे माणसाच्या पायाशी लोळण घेत आहेत. परंतू भोजराजभाऊंनी ग्रामीण भागातून ज्या काळात विदर्भ न्यायच्या माध्यमातून ग्रामीण पत्रकारितेची वाटचाल सुरू केली तो काळ आव्हानांचा, समस्यांचा होता. कठीण कातराला भेदून पिंपळवृक्ष ज्या पध्दतीने फोफावतो आव्हानांना न भिता तोंडघशी पाडण्याचा जिगरबाज स्वभाव भोजराजभाऊंचा होता. जेमतेम शिक्षणाच्या बळावर त्यांचा हात शेवटच्या श्वासापर्यंत लिहता राहिला. शिक्षणाचा प्रतिभेचा सूतराम सबंध नसतो हे भोजराजभाऊ यांच्या लेखनीच्या सातत्याने सिध्द केलं. त्यांचे प्राण ग्रामीण पत्रकारितेमध्ये गुंतले होते. आपल्या मुलांची जडणघडण करताना त्यांनी स्थावर आर्थिक सक्षमता बहाल केली नाही पण शब्दांचा वसा-वारसा त्यांच्या सुपूर्द केला. त्यांच्यातल्या निष्ठेचा भक्तीचा, सचोटीचा परिणाम म्हणून त्यांच्या पहिल्या स्मृती दिनानिमित्त वडिलांच्या संपूर्ण प्रवासाच्या आठवणी पुस्तक रूपातून समाजासमोर मांडल्या. एखाद्या बोरला पाणी लागणे आणि संतती चांगली निघणे प्रत्येकाच्या नशीबी नसते. भोजराजभाऊ हे पुण्यवान आहेत कि त्यांच्या परिवाराने या सोहळ्याला चिरस्मरणीय केले आहे.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कु. मयुरी गजानन झोरे यांनी तर आभार प्रदर्शन मोहम्मद असलम अंजूम यांनी केले. यावेळी ठाणेदार युवराज रबडे, सोहम जीवन गाडेकर यांचीही समयोचित भाषणे झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी तेजरावबापू देशमुख, सागर मगर, ज्ञानेश्वर राऊत, संजय देशमुख, दीपक गवळी, विलास आंभोरे, अरूण देशमुख, सुनील रिंढे पाटील, संजय गाडगे, सोमेश्वर इंगळे, विशाल गाडेकर, शिवाजी लहाने यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी उर्दू हायस्कूलवर शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल अक्षय गणेश डोईफोडे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.



### विदर्भ न्याय परिवाराच्या रोमारोमात उपक्रमशिलता भिनलेली : सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज

पाखरं आकाशाच्या दिशेने भरारी घेतात. घरटं एकाकी पडतं पक्षी-पक्षीणी पाखरं परत येण्याची वाट पाहतात. घरटं सोडून गेलेली पाखरं इंद्रधनुष्यी आकाशातल्या भौतिक सुखसमृध्दीत रमतात नंतर घराकडे परतने विसरतात. अशा शोकांतिककाळात बापाचा वसा - वारसा, बापाच्या आवडी- निवडीचा, छंदाचा समर्पित भाववृत्तीचा वसा वारसा मुलांनी समर्थपणे खांद्यावर पेलण्याची जबाबदारी हे अपवादानेच घडते. पत्रतपस्वी ग्रंथासाठी संतोष गाडेकरांनी घेतलेली मेहनत वाखाणण्याजोगी आहे.भोजराज गाडेकर यांच्या सहवासातील लोकांना लिहतं केलं. ते क्षण सजीव करून स्मृतीग्रंथाची संकल्पना महानगरीय होती.

### पत्रतपस्वी ग्रंथ ग्रामीण पत्रकारितेच्या वाटेवरचा मैलाचा दगड : डॉ. निलेश गावंडे

वडिलांच्या उपक्रमशीलतेचे बिजारोपन करून संतोष गाडेकर यांनी विदर्भ न्याय पर्यंत मर्यादित न राहता दरवर्षी वेगवेगळ्या उपक्रमांची आखणी करताना समाजामध्ये आपल्या आयोजनाचा उपक्रमशिलतेच्या माध्यमातून समाजाला काहीतरी देणं लागतो याचं सजग भान ठेवत विदर्भ न्यायच्या माध्यमातून उपक्रमशीलतेची दणकट साक्ष आहे. पदरमोडीतून असे खर्चिक कार्यक्रम आयोजित करणे सोपे नसते. वडिलांची पुण्यतिथी घरीही साजरी करता आली असती पण वडिलांच्या पुण्यतिथीला सामाजिक कृतज्ञतेची किनार बहाल करून वस्तुनिष्ठ पत्रकारितेला समर्पित करत प्रेरणा मिळण्यासाठी पत्रकारांना, विद्यार्थ्यांना सन्मानित केले. वडिलांच्या ऋणातून कोणीही उतराई होऊ शकत नाही पत्रकार बापाच्या पुण्यस्मरणानिमित्त सामाजिक जाणिवेतून अशा भावनिक सोहळ्याचे आयोजन करुन मला या स्वागतसमारंभाचे अध्यक्ष केले हे माझे अहोभाग्य आहे असे ते म्हणाले.

### या पत्रकारांचा झाला सन्मान

यावेळी सुषमा राऊत देऊळगावराजा, राजेश तोटे खामगाव, मधुकर मोहिते बिबि, सुखनंदन इंगळे बुलडाणा, राजेश दवणे यवतमाळ यांना पत्रतपस्वी स्व भोजराज नरहरी गाडेकर उत्कृष्ट कार्यगौरव पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### पुनम वायसेंनी केली चित्तथरारक प्रात्यक्षिके

दरम्यान दुधा येथील शिवकालीन युगंधर मैदानी खेळात पारंगत कु. पुनम वायसेंनी विविध चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून रसिकांची वाहवा मिळवली.

# सिंधुदुर्ग विकासाच्या नव्या वळणावर...

सिंधुदुर्गच्या निसर्गसौंदर्याचे संवर्धन करत आर्थिक समृद्धी साधण्याच्या उद्देशाने पुढील २५ ते ३० वर्षांचा भविष्यवेधी विकास आराखडा पालकमंत्री नितेश राणे यांच्या संकल्पनेतून साकारला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक प्रकल्पांना चालना देतानाच व्हीव्हीआयपी पर्यटकांना आकर्षित करणारी 'ताज'सारखी पंचतारांकित हॉटेल्स आणि नवीन पर्यटनस्थळे विकसित केली जात आहेत. राज्यातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून ओळख असलेल्या सिंधुदुर्गाला आता पर्यटनाच्या दृष्टीने अधिक विकसित आणि सक्षम करण्याच्या दिशेने नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. विकासाच्या नव्या वळणावरील सिंधुदुर्गच्या प्रगतीचा हा आढावा.

जहाजबांधणी उद्योगाच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच जलवाहतूक, चिपी विमानतळ आणि दर्जेदार रस्त्यांच्या जाळ्याद्वारे दळणवळणाचा विस्तार केला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून वातावरणातील बदलांपासून हापूस आंबा, काजू आणि कोकम पिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. जहाजबांधणीसारखे पर्यावरणपूरक उद्योग सिंधुदुर्गात आणण्यासोबतच आधुनिक मत्स्यव्यवसाय, स्थानिक कला व संस्कृतीच्या विकासासाठी कलाकारांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावरही भर आहे. सक्षम आरोग्य सुविधा, कौशल्य विकास, शून्य कचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पूर व दरड प्रतिबंधक उपाययोजना तसेच प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यांना प्राधान्य देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल, पर्यटन, शेती-मत्स्यव्यवसाय, रोजगार आणि गतिमान पायाभूत सुविधा या पंचसूत्रीच्या माध्यमातून सिंधुदुर्गला शाश्वत आर्थिक विकासाच्या दिशेने नेण्याचा सुरू आहे.

निसर्गाचे मुक्त वरदान लाभलेला, अथांग अरबी समुद्रकिनारा आणि हिरवागार सह्याद्री यांची समृद्ध देणगी लाभलेला सिंधुदुर्ग जिल्हा आज शाश्वत प्रगतीच्या एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. निसर्गसौंदर्य जपत असताना जिल्ह्याला आर्थिक सुबत्तेकडे कसे नेता येईल, हा प्रश्न कोकणाच्या संदर्भात नेहमीच कळीचा राहिला आहे. पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक उन्नती या दोन्ही गोष्टींचा समांतर समतोल साधत जिल्हा प्रशासन अत्यंत नियोजनबद्धरीतीने या ध्येयाकडे वाटचाल करत आहे. उद्देश एकच पर्यावरणपूरक विकास आणि रिव्हर्स मायग्रेशन.

**पर्यावरण आणि विकासाचा समांतर समतोल**

विकास आराखडा तयार करताना पर्यावरण आणि प्रगती हे एकमेकांशी विसंगत नसून परस्परपूरक आहेत, हे तत्त्व केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. मालदीवसारख्या आंतरराष्ट्रीय पर्यटन क्षेत्राचे उदाहरण घेतल्यास, तिथे समुद्रात भव्य वॉटर व्हिला उभारूनही तिथल्या सागरी परिसंस्थेला धक्का पोहोचू दिला गेला नाही. योग्य मार्ग आणि नियोजनबद्ध उपाययोजनांमुळे हे शक्य झाले. त्याच धर्तीवर सिंधुदुर्गातही निसर्गाचे मूळ सौंदर्य अबाधित ठेवून विकासकामे पुढे नेली जात आहेत. केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता प्रशासकीय पातळीवर पर्यावरणपूरक, प्रयोगशील आणि धाडसी धोरणात्मक निर्णय घेण्यावर भर दिला जात आहे.

**उच्च खर्च क्षमतेचे पर्यटन आणि दरडोई उत्पन्न वाढ**

जिल्ह्याची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी दरडोई उत्पन्नातील तफावत भरून काढणे अनिवार्य आहे. शेजारील गोव्याचे दरडोई उत्पन्न सुमारे साडेचार ते पाच लाख रुपयांच्या घरात पोहोचले असताना सिंधुदुर्ग अजूनही दोन ते सव्वादोन लाखांच्या आसपास आहे. हे अंतर कमी करण्यासाठी केवळ बजेट पर्यटनावर मर्यादित न राहता उच्च खर्च क्षमता असणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

यासाठी जिल्ह्यात 'ताज','हयात' सारख्या जागतिक ख्यातीच्या पंचतारांकित हॉटेल ब्रँड्सचे जाळे विणले जात आहे. सोबतच 'डिझनीलँड' व 'युनिव्हर्सल स्टुडिओ' सारख्या भव्य मनोरंजन प्रकल्पांच्या संकल्पनांवर काम सुरू आहे. पर्यटक जिल्ह्यात केवळ एक-दोन दिवस थांबून गोव्याकडे निघून जाऊ नयेत, तर त्यांनी येथे किमान तीन ते चार दिवस मुक्काम करावा, यादृष्टीने सुमारे २५ नवीन पर्यटन स्पॉट्स विकसित करण्यात येत आहेत. यामुळे स्थानिक हॉटेल व्यावसायिक, टॅक्सी चालक, गाईड्स आणि गृहउद्योगांच्या उत्पन्नात मोठी वाढ होईल.

**जहाज बांधणी उद्योग आणि स्थानिक तरुणांचे स्थलांतर रोखणे**

जिल्ह्यातील सर्वाधिक संवेदनशील आव्हान म्हणजे हुशार आणि उच्चशिक्षित मनुष्यबळाचे होणारे स्थलांतर. दहावी-बारावीत १०० टक्के निकाल देणारी स्थानिक गुणवत्ता केवळ रोजगाराच्या शोधात मुंबई, पुणे अथवा गोव्यात जाते. ही बौद्धिक संपत्ती जिल्ह्यातच स्थिरावली पाहिजे, यासाठी मोठ्या पर्यावरणपूरक उद्योगांना निमंत्रित केले जात आहे. आता रिव्हर्स मायग्रेशन जिल्ह्यात सुरु व्हायला सुरुवात झाली आहे.

गोव्यात नव्याने उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलांच्या उंचीच्या मर्यादेमुळे तेथील ३० मीटर उंचीची जहाजे बांधणाऱ्या 'शिप बिल्डिंग इंडस्ट्री'ला जागेची व संचलनाची अडचण निर्माण झाली आहे. भारतातील एकूण जहाजांपैकी सुमारे ४० टक्के जहाजे गोव्यात तयार होतात. हा उद्योग थेट ६ ते ७ हजार आणि अप्रत्यक्षरीत्या १० हजारांहून अधिक रोजगार देणारा आहे. गोव्यातील या अडचणीचे रूपांतर सिंधुदुर्गासाठी संधीत करण्यासाठी गोवा शिपयार्ड व गोवा शिपिंग असोसिएशनशी चर्चा सुरू आहे. या उद्योगाचा विस्तार जिल्ह्यात झाल्यास हजारो स्थानिक तरुणांना स्वतःच्याच मातीत दर्जेदार तांत्रिक व प्रशासकीय रोजगार उपलब्ध होईल.

**गतिमान दळणवळण : जल, हवाई आणि रस्ते क्रांती**

पर्यटन आणि उद्योगांच्या विस्ताराला खरी गती देण्यासाठी आधुनिक, बहुआयामी दळणवळण यंत्रणा उभारण्यावर जिल्हा प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. जलवाहतुकीच्या क्षेत्रात क्रांती घडवताना चिपी विमानतळाजवळील कर्ली ते तारकर्ली दरम्यान सागरी जलमार्ग सुरू करण्याचे नियोजन असून, सध्या रस्तेमार्गे १ तास २० मिनिटे लागणारे हे अंतर या जलमार्गामुळे अवघ्या ११ मिनिटांत पूर्ण होणार आहे. हवाई वाहतुकीला बळकटी देण्यासाठी चिपी विमानतळ २४ तास कार्यान्वित ठेवण्याचे प्रयत्न सुरू असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून थेट विमानफेऱ्या सुरू होत आहेत. रेल्वे प्रवाशांसाठी नव्या गाड्या आणि नियमित फेऱ्या वाढवण्यावर भर दिला जात आहे. शेजारील मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळ जिल्ह्याच्या सीमेवर असल्याने सिंधुदुर्ग हे गोव्याचे नैसर्गिक विस्तार क्षेत्र ठरत असून, तिथे उतरणाऱ्या पर्यटकांना जिल्ह्यात वळवण्यासाठी सर्व पायाभूत सुविधा सज्ज ठेवल्या जात आहेत. यासोबतच जिल्ह्यातील दुर्गम भागांतही पर्यटक आणि नागरिकांना अखंड डिजिटल संपर्क मिळावा म्हणून बीएसएनएल आणि जिओच्या सहकार्याने दूरसंचार जाळे अधिक सक्षम केले जात आहे.

**कृषी मूल्यवर्धन, सागरी अर्थव्यवस्था आणि स्थानिक संस्कृती**

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात स्थानिक शेतकरी, बागायतदार आणि मच्छीमार केंद्रस्थानी आहेत. कोकणाचा राजा असलेला जगप्रसिद्ध हापूस आंबा, काजू आणि कोकम यांसारख्या स्थानिक फलोत्पादनांवर जिल्ह्यातच प्रक्रिया करणारे ॲग्रो-प्रोसेसिंग युनिट्स उभारण्यात येत आहेत, ज्यामुळे थेट शेतकऱ्यांच्या नफ्यात वाढ होईल.

सागरी अर्थव्यवस्थेला चालना देताना पारंपरिक मच्छीमारांचे हक्क अबाधित ठेवून आधुनिक शीतगृहे, मासळी प्रक्रिया आणि थेट निर्यातीसाठी कार्गो साखळी निर्माण केली जात आहे. सावंतवाडीची ऐतिहासिक लाकडी खेळणी, तांब्या-पितळेची कलाकुसर आणि मालवणी खाद्यसंस्कृतीला पंचतारांकित हॉटेल्सशी जोडून महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळवून दिली जात आहे. सोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सारख्या सर्वच जलदुर्गांचे जतन आणि दशावतारासारख्या पारंपरिक लोककलांना पर्यटनाशी जोडून सांस्कृतिक वारसा जपला जात आहे.

**आरोग्य, आधुनिक तंत्रज्ञान आणि आपत्ती व्यवस्थापन**

शाश्वत प्रगतीसाठी नागरिकांचे जीवनमान सुरक्षित आणि समृद्ध असणे गरजेचे आहे. उपचारांसाठी शेजारील जिल्हा किंवा राज्यांवर अवलंबून राहावे लागू नये म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि मल्टिस्पेशालिटी आरोग्य सुविधा जिल्ह्यात सक्षम केल्या जात आहेत. उद्योग व हॉस्पिटॅलिटी क्षेत्राच्या गरजेनुसार स्थानिक तरुणांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे सुरू केली जात आहेत. वाढत्या पर्यटनामुळे निसर्गाची हानी होऊ नये म्हणून शून्य कचरा, आधुनिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आणि सौरऊर्जेचा वापर अनिवार्य केला जात आहे.

पावसाळ्यातील अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसू नये म्हणून नद्यांमधील गाळ उपसण्याचा पद्धतशीर कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, यामुळे पुराची ६० ते ७० टक्के समस्या मार्गी लागत आहे. घाट रस्त्यांवर दरडी कोसळू नयेत म्हणून आधुनिक संरक्षक जाळ्या बसवून सुरक्षितता वाढवण्यात आली आहे. प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वाधिक वापर करून ई-प्रशासनाच्या माध्यमातून पारदर्शक आणि जलद निर्णयप्रक्रिया राबवणारा जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग पथदर्शी ठरत आहे.

पर्यावरणाचा समतोल, उच्च दर्जाचे पर्यटन, स्थानिक शेती-मत्स्यव्यवसायाचे सक्षमीकरण, पर्यावरणपूरक रोजगार आणि गतिमान पायाभूत सुविधा या पंचसूत्रीवर सिंधुदुर्गाचा पुढील २५ वर्षांचा विकास आराखडा साकारला जात आहे. निसर्गाचे पावित्र्य जपत आर्थिक संपन्नतेकडे टाकलेले हे पाऊल सिंधुदुर्ग जिल्ह्याला विकासाच्या राष्ट्रीय नकाशावर अग्रस्थानी नेणारे नक्कीच ठरेल.

०००

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग**

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ॲक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

# दुष्काळ सदृश्य यादीतून जिल्हा वगळल्यामुळे सिंदखेडराजा तालुक्यातील सत्ताधारी कार्यकर्ते व शेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रिया !



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंदखेडराजा : राज्य सरकारने दुष्काळ सदृश्य स्थितीचा आढावा घेऊन त्यावर निर्णय घेण्याकरिता व त्यांना मदतीचा हात देण्याकरता काही दिवसांमध्ये निर्णय घेतले त्यांची शक्यता आहे राज्य सरकारने दुष्काळ सदृश्य यादी मधून मात्र बुलढाणा जिल्हा वगळल्यामुळे जिल्हाभरात त्याचबरोबर सिंदखेडराजा तालुक्यातील शेतकरी वर्ग मधून नाराजी व्यक्त होत आहे सप्टेंबर महिना लागला तरी पाऊस नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीनचे पिके सुकलेली आहेत अशातच हातातोंडाशी आलेला घास गेल्यामुळे शेतकरी वर्ग राज्य सरकारच्या निर्णयावर अवलंबून आहे अशातच दुष्काळग्रस्त यादीतून जिल्हा वगळल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला रोष व्यक्त केला आहे.**

प्रतिक्रिया

मकरंद आबा पाटील यांची भेट घेऊन आम्ही अगोदरच बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा अशी मागणी केलेली होती परंतु परत एकदा त्यांची भेट घेऊन बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करावा अशी मागणी करणार आहोत आणि शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत द्यावी ही आमची मागणी आहे.

**अँड नाझेर काझी**
**( प्रदेशाध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार पक्ष)**

------------------

प्रतिक्रिया

सध्या जिल्ह्यातील विशेषतः सिंदखेडराजा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसण्याचे काम राज्य सरकार वारंवार करत आहे बघा दुष्काळ सदृश्य यादी मधून जिल्हा वगळण्यात आलेला आहे परंतु सध्या पाऊस नाही पिण्यासाठी सुद्धा पाऊस नाही अशा परिस्थितीमध्ये सरकार शेतकऱ्यांना त्रास देण्याचे काम करत आहे मागच्या वर्षी सिंदखेडराजा तालुक्यात पाऊस जास्त पडला मात्र पर्जन्यमापक यंत्रणे कडे याची नोंद नसल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचा पिक विमा नाकारला गेला गमतीचा भाग असा आहे की यावर्षी पाऊसच पडला नाही जून जुलै ऑगस्ट या महिन्यामध्ये मात्र पर्जन्यमापक यंत्रणेकडे ४३८ मिमी पाऊस पडल्याची नोंद आहे एवढा पाऊस पडल्यामुळे नदी नाल्या ओसंडून वाहायला हव्या होत्या ,मागच्या वर्षी पाऊस पडला तर नोंद नाही आणि यावर्षी पाऊसच पडला नाही तरी नोंद केली याचा अर्थ पिक विमा कंपनी आणि पर्जन्यमापक यंत्रणा यांचे लागेबंद संबंध आहे म्हणून शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे , जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून हेक्टरी २५ हजार रुपयाची मदत द्यावी अशी मागणी आम्ही करणार आहोत

**बालाजी सोसे**
**(शेतकरी योद्धा कृती समिति संस्थापक अध्यक्ष)**

------------------

प्रतिक्रिया

पाहिजे तसा पाऊस जिल्ह्यामध्ये सिंदखेडराजा तालुक्यामध्ये झालेला नाही शासनाने त्वरित पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत द्यावी तसेच अजूनही शेतकऱ्यांना संपूर्णपणे कर्जमाफी झालेली नाही राहिलेल्या शेतकऱ्यांना त्वरित कर्ज माफी द्यावी ही आमची मागणी आहे.

**सिद्धार्थ जाधव**
**(तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गट )**

------------------

प्रतिक्रिया

दुष्काळग्रस्त यादी मधून बुलढाणा जिल्हा वगळल्यामुळे डोळ्याला पट्टी लावून सर्वे केला की काय असे वाटत आहे एका बाजूला पाऊस नसल्यामुळे सिंदखेडराजा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्या देशोधडीला लागला आहे सरकारने शेतकऱ्यांना कुठलीही अट न ठेवता हेक्टरी एक लाख रुपयांची आर्थिक मदत त्वरित द्यावी ही आमची मागणी आहे

**बाबुरावजी मोरे**
**(जिल्हा उपप्रमुख शिवसेना शिंदे गट )**

------------------

प्रतिक्रिया

बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांच्याकडे आमच्या नेत्या आ . श्वेताताई महाले यांनी भेट घेऊन बुलढाणा जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीची संपूर्ण माहिती दिली आहे आणि ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे शासनाने पंचनामे करून ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना भरीव मदत द्यावी ही आमची मागणी आहे या संदर्भामध्ये आम्ही परत जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांची भेट घेऊन दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून घोषित करावा अशी मागणी करणार आहोत

**अंकुर देशपांडे**
**( भाजपा जिल्हा उपाध्यक्ष )**

------------------

प्रतिक्रिया

शासनाने शेतकऱ्याच्या तोंडाला पाणी पुसली असून राज्य सरकारने बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करून हेक्टरी एक लाख रुपये मदत घ्यावी

**विशाल गवई**
**( युवा जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी )**

## मोहाडी येथील प्रशांत रिंढे यांना डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार जाहीर

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**सिंदखेडराजाः** सिंदखेडराजा तालुक्यातील मोहोडी येथील रहिवाशी असलेले व सध्या बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आपले कर्तव्य चोखपणे पार पाडत असलेले कर्तव्यदक्ष महसूल सहाय्यक कर्मचारी प्रशांत दिलीप रिंढे यांना यावर्षीचा डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रशांत रिंढे हे सध्या जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक आहेत प्रत्येक नागरिकांची अतिशय सौजन्यपूर्ण वागणूक ते देतात वयोवृद्ध नागरिक आबालवृद्ध या सर्वांना ते सहकार्य करत असतात शासनाच्या व प्रशासनाच्या माध्यमातून अनेकांची कामे ते करतात शांत व संयमी स्वभाव त्यांचा आहे दिवंगत सामाजिक वनीकरण विभागाचे माजी कर्मचारी असलेले मधुकर खंडारे यांच्या स्मृतिदिनानिमित्त साखरखेर्डा येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत असते सदर यावर्षी प्रशांत रिंढे यांना उत्कृष्ट कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे सदर पुरस्कार निवड समितीचे संयोजक आयोजक सचिन खंडारे त्याचबरोबर विकास सुखदाने यांनी दि १० सप्टेंबर रोजी निवड पत्र देऊन सदर निवड केली आहे. त्यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जिल्हाभरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे

## देऊळगाव राजात २३ वर्षीय युवकाचा मृत्यू

**देऊळगाव राजा :** शहरातील जुना जालना रोड परिसरात २३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश्वर अभय जाधव (वय २३, रा. पोपळ शिवणी, ता. सिंदखेड राजा, सध्या देऊळगाव राजा) हा काकड हॉस्पिटल परिसरातील आपल्या राहत्या घरी मृतावस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच देऊळगाव राजा पोलिसांनी नोंद करून तपास सुरू केला आहे. सदर प्रकरणाचा तपास पोलीस नाईक गिते करीत आहेत.

## भरवस्तीत ठो ठो! प्रसिद्ध गायकाच्या घराबाहेर रात्री फायरिंग; 10-12 गोळ्या झाडल्या

बरनाला : प्रसिद्ध पंजाबी गायक गुलाब सिद्धू याच्या संबंधित एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. पंजाब येथील बरनालातील फरवाही येथे गुलाब याच्या घरावर अंदाधुंद गोळीबाराचा प्रकार घडला आहे. शनिवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हल्लेखोर मोटारसायकलवरुन आले होते. गोळीबार झाल्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरुन पसार झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या घटनेवेळी गायकाचे संपूर्ण कुटुंब घरी उपस्थित होते. या धक्कादायक घटनेचा सीसीटीव्ही फुटेज सध्या सोशल मीडियात व्हायरल होत आहे. घटनेवेळी गुलाब सिद्धू यांच्या कुटुंबातील सदस्य घरी उपस्थित होते.

## जिप उर्दू शाळेजवळील मटन-चिकन मार्केट हलवले : मात्र मुख्य रस्त्यावरील दुकानांमुळे व्यापाऱ्यांमध्ये रोष




निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**साखरखेर्डा :** येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेजवळ गेल्या अनेक वर्षांपासून भरणाऱ्या मटन-चिकन मार्केटमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. शाळा प्रशासन व पालकांच्या तीव्र तक्रारीनंतर ग्रामपंचायत प्रशासनाने हे मार्केट अखेर अन्यत्र हलविण्यात आले आहे. मात्र नव्या जागेवर जाण्याऐवजी काही दुकानदारांनी थेट मुख्य महामार्गावरच दुकाने थाटल्याने इतर व्यापाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, गत १० ते १२ वर्षांपासून शाळेच्या अगदी गेटच्या बाजूलाच मटन-चिकन मार्केट असल्याने परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता आणि भटक्या प्राण्यांचा वावर वाढला होता. याचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या आरोग्याला बसत होता. ही बाब लक्षात घेऊन शाळा प्रशासनाने जिल्हा परिषद व ग्रामपंचायतकडे तक्रार करून हे मार्केट तत्काळ हटविण्याची मागणी लावून धरली होती. पालकांच्या वाढत्या दबावानंतर ग्रामपंचायतीने तक्रारीची दखल घेत संबंधीत दुकानदारांशी समन्वय साधत हे मार्केट मेहकर रोडवरील कृषी उत्पन्न उपबाजार समितीच्या जागेजवळ हलविण्याचा निर्णय घेतला.

मुख्य रस्त्यावरील दुकानांमुळे नवीन वाद प्रशासनाने नवीन जागा निश्चित करून दिल्यानंतरही काही चिकन दुकानदारांनी बसस्थानकाजवळील मुख्य राज्य महामार्गावरच आपली दुकाने थाटली आहेत. मुख्य रस्त्यावर सहज उपलब्धतेमुळे बहुतांश ग्राहक ग्रामपंचायतीने ठरवून दिलेल्या अधिकृत मार्केटकडे न जाता रस्त्यावरील दुकानांमधूनच खरेदी करत आहेत. त्यामुळे नियमांचे पालन करून उपबाजार समितीजवळ गेलेल्या दुकानदारांच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला असून त्यांच्यात तीव्र रोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### प्रशासकीय कारवाईची मागणी

आम्ही प्रशासनाच्या निर्णयाचा मान राखून नवीन जागेवर गेलो, मात्र काही व्यापारी मुख्य रस्त्यावर दुकाने थाटून अनधिकृतपणे विक्री करत आहेत. यामुळे आमचे प्रचंड नुकसान होत आहे, असा आरोप अधिकृत व्यापाऱ्यांनी केला आहे.

ग्रामपंचायत प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करून मुख्य रस्त्यावरील ही अवैध चिकन दुकाने त्वरित हटवावीत अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही व्यापाऱ्यांनी दिला आहे.

## तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत अजय वायकर प्रथम

### स. व. प. हायस्कूल येवतीच्या विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**लोणार :** आदिवासी आश्रमशाळा, लोणार येथे आयोजित तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल, येवती येथील इयत्ता नववीचा विद्यार्थी अजय गजानन वायकर याने दमदार कामगिरी करत १५ वर्षे वयोगटातील ४२ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला.

मूळचा वझर आघाव येथील असलेला अजय परांडा, जिल्हा धाराशिव येथे नियमितपणे कुस्तीचा सराव करतो. सरावातील सातत्य, मेहनत आणि कुस्तीतील कौशल्याच्या जोरावर त्याने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजेतेपदाला गवसणी घातली.

अजयच्या या यशामागे त्याचे नियमित कष्ट तसेच शाळेचे क्रीडा शिक्षक वाघ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल, येवतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अजयच्या यशाबद्दल मुख्याध्यापक विजय थोरवे, विष्णू गीते, शिक्षकवृंद, ग्रामस्थ तसेच क्रीडाप्रेमींनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच त्याच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी शुभेच्छा देत भविष्यातही कुस्ती क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

## रावेर लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उबाठा) चे जिल्हा संपर्कप्रमुख गुलाबराव वाघ यांच्या उपस्थितीत मलकापूर तालुक्याची आढावा बैठक संपन्न

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**मलकापुर:** शिवसेना पक्ष पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे,शिवसेना नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशान्वये शिवसेना उपनेते तथा रावेर लोकसभा संपर्कप्रमुख गुलाबराव वाघ यांच्या उपस्थितीत दि.१३ सप्टेबर २६ रविवार रोजी सकाळी ११ वाजता महेश भवन येथे मलकापूर तालुक्याची आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीला शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, किसान सेना, कामगार सेना, तसेच अंगिकृत संघटनाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मलकापूर तालुक्यातील आढावा व संघटन बैठक, बी. एल. ए. नेमणूक, रिक्त पदाधिकारी नेमणूक करणे,तसेच निष्ठावंत शिवसैनिक यांच्याशी चर्चा करून सर्वांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल असे उपनेते तथा संपर्कप्रमुख रावेर लोकसभा क्षेत्र गुलाबराव वाघ यांनी सर्वांना आश्वासित केले. तसेच पक्षनेतृत्व व उपनेते तथा संपर्कप्रमुख (रावेर लोकसभा क्षेत्र ) पक्षाचा प्रतिनिधी म्हणून सदैव सोबत आहे. त्यामुळे तुम्हांला कोणाच्याही गुंडगिरीला, हुकुमशाहीला घाबरण्याची गरज नाही.

यावेळी उपस्थित उपनेते तथा संपर्कप्रमुख रावेर लोकसभा क्षेत्र गुलाबराव वाघ, बुलढाणा जिल्हाप्रमुख गजानन वाघ,सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, मलकापूर विधानसभा संपर्कप्रमुख ललित मुथा, महिला आघाडी जिल्हाप्रमुख रावेर लोकसभा क्षेत्र प्रतिभाताई जगदाळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपुत, शिवसेना उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे, उपशहर प्रमुख शकील जमादार, किसान सेना उपतालुकाप्रमुख विश्वनाथ पुरकर, उपतालुकाप्रमुख गजानन मेंहेंगे, उपतालुकाप्रमुख विष्णू धोरण नांदुरा,उपतालुकाप्रमुख विनोद मानकर नांदुरा, युवा सेना तालुकाप्रमुख पवन गरुड, युवासेना उपतालुकाप्रमुख अमित राजपूत,अल्पसंख्यांक सेना उपजिल्हाप्रमुख सै.वसीम सै रहीम, माजी नगरसेवक पांडुरंग चिम,मुक्ताईनगर विधानसभा संघटक नितीन गोसावी, सोशल मीडिया (डिजी) समन्वयक रावेर लोकसभा क्षेत्र जयवंत चौधरी (राजपुत),अर्जून तांगडे,विजय झांबरे, सत्तार शाह,चॉद चव्हाण, गजानन उंबरकर, महादेव लटके, अनिल झांबरे, निना झांबरे, गोकुळ पाटील, नितीन चोपडे, पियुष मोरे, शिवप्रसाद निळे, भूषण पाचपोळ, रामराव तळेकर, विजय चित्रंग, हसन गौरी,शेख मोहसीन, गणेश पाटील,चंदू महाजन, उमेश क्षीरसागर, जावेद खान , इक्बाल शेख,शेख रफीक शेख नबी,नवाजखान इज्जतउल्ला खान,सिद्धेश्वर मंडळकर, किशोर राऊत संजय कातव, अमित खर्चे, आनंद वाघ, रोशन ढोकणे, अमोल निकम,ओम शिरसाट, अब्दुल रईस तेली, अब्दुल समीर तेली तसेच मलकापूर तालुक्यातील समस्त शिवसैनिक उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या वीजप्रश्नावर आमदार खरात आक्रमक; महावितरणला थेट कारवाईचा इशारा!

## खंडित वीजपुरवठा तातडीने सुरळीत करा; बेजबाबदार अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारांवर कारवाईचे स्पष्ट निर्देश

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



मेहकर : मेहकर व लोणार तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. पिकांना पाणी देण्यासाठी विहिरी व कृषीपंपांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा मोठा फटका बसत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार सिद्धार्थ खरात यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या वीज समस्या तातडीने सोडविण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

मेहकर येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या जनसंवाद कार्यालयात झालेल्या बैठकीत मेहकर मतदारसंघातील मेहकर व लोणार तालुक्यातील वीजपुरवठ्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. वारंवार होणारे वीजखंडित होणे, शेतकऱ्यांना वेळेवर वीज उपलब्ध न होणे, तक्रारींचे वेळेत निराकरण न होणे तसेच वीज यंत्रणेच्या दुरुस्ती व देखभालीच्या कामातील विलंब याबाबत आमदार खरात यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

सध्या खरीप हंगाम अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर असून पावसाअभावी अनेक भागांत पिके कोमेजण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी उपलब्ध वेळापत्रकानुसार कृषीपंप सुरू करून पिकांना पाणी देण्याचा प्रयत्न शेतकरी करीत आहेत. मात्र, वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत आहेत. वीजपुरवठा सुरळीत ठेवणे आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे ही महावितरणची जबाबदारी आहे.

शेतकऱ्यांना वीजेसाठी हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी संबंधित यंत्रणेने तत्परतेने काम करावे, असे निर्देश आमदार खरात यांनी दिले. वीज यंत्रणेच्या दुरुस्ती, देखभाल किंवा इतर कामांमध्ये अधिकारी, कर्मचारी अथवा एजन्सी-कंत्राटदारांकडून हलगर्जीपणा होत असल्यास तो कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका आमदार खरात यांनी घेतली.

शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा सूचना देऊनही कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे कानाडोळा करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करा, असा स्पष्ट संदेश यावेळी आमदार खरात यांनी दिला. मेहकर-लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सध्याचा काळ अत्यंत निर्णायक आहे.

पाऊस लांबल्यास हातातोंडाशी आलेले खरीप पीक धोक्यात येण्याची शक्यता असल्याने कृषीपंपांसाठी उपलब्ध वीजपुरवठा सुरळीत राहणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे वीजपुरवठ्याचा प्रश्न हा केवळ प्रशासकीय बाब नसून थेट शेतकऱ्यांच्या पिकांच्या अस्तित्वाशी जोडलेला प्रश्न असल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी उपस्थित शेतकरी बांधवांच्या समस्या जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना त्या तातडीने सोडविण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांच्या पिकांना वेळेवर पाणी मिळावे आणि वीजपुरवठ्यामुळे त्यांच्या शेतीचे नुकसान होऊ नये, यासाठी महावितरणने अधिक जबाबदारीने व तत्परतेने काम करावे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

बैठकीस शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव. तालुका समन्वय श्याम निकम यांच्यासह महावितरणचे संबंधित अधिकारी व कर्मचारी, वीज तंत्रज्ञ तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतकऱ्यांच्या वीज समस्यांबाबत आपली भूमिका मांडत होते.

## मुंबई-बंगळूर महामार्गावर भीषण अपघात; २ ठार, १२ जखमी

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**पुणे :** मुंबई-बंगळूर महामार्गावरील जांभूळवाडी परिसरातील दरी पुलावर शनिवारी मध्यरात्री चार वाहनांचा भीषण अपघात झाला. दोन ट्रक आणि दोन मोटारींच्या या अपघातात २ जणांचा मृत्यू झाला असून १२ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास एक ट्रक साताऱ्याच्या दिशेने मुंबईकडे जात होता. जांभूळवाडी येथील दरी पुलाजवळ ट्रक चालक प्रमोद विठ्ठल वाघ यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर ट्रक त्याच लेनमधून पुढे जाणाऱ्या आयशर ट्रकवर जोरदार आदळला.

दोन्ही ट्रकची धडक इतकी जोरदार होती की ते दुभाजक तोडून विरुद्ध दिशेच्या रस्त्यावर गेले. त्याचवेळी समोरून येणाऱ्या एर्टिगा आणि टाटा अल्ट्रोझ या दोन मोटारींना ट्रकने धडक दिली. काही क्षणांत चार वाहनांचा हा अपघात झाला.

या दुर्घटनेत टाटा अल्ट्रोझमधील आनंदीबाई रामचंद्र वाडकर (वय ५०, रा. नेरूळ, नवी मुंबई) आणि हृदयनाथ मोहन गायकवाड (रा. जोगेश्वरी पूर्व, मुंबई) यांचा मृत्यू झाला. तर या अपघातात एकूण १२ जण जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच आंबेगाव पोलिस ठाण्याचे कर्मचारी, भारती विद्यापीठ वाहतूक विभागाचे पोलिस तसेच अग्निशमन दलाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस आणि अग्निशमन दलाच्या पथकाने तातडीने बचावकार्य सुरू केले. जखमींना रुग्णालयात हलवण्यात आले.

दरम्यान, अपघातग्रस्त वाहने महामार्गावरच अडकल्याने काही काळ वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. वाहनांच्या रांगा लागल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. अखेर क्रेनच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करण्यात आली. त्यानंतर वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली.

या अपघातामागचे नेमके कारण आणि ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण कशामुळे सुटले, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## ८० वर्षांच्या वृद्धेचे हातपाय बांधून सहा तोळे दागिने लुटले, तपासाकरिता तीन पथके रवाना

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**कोल्हापूर :** घरातील खोलीत झोपलेल्या वृद्धेचे हातपाय आणि तोंड बांधून त्यांच्या अंगावरील सहा तोळे सोन्याचे दागिने चोरट्याने लांबवले. कुणाला काही समजण्याच्या आत मागच्या दाराने चोरटे पाठीमागच्या दारातून पसार झाले. शनिवारी मध्यरात्री ही घडली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील महाडिकवाडी येथे वयोवृद्ध पुरुष लघुशंकेसाठी घराबाहेर गेल्याची संधी साधून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. खोलीत झोपलेल्या वृद्धेचे हातपाय आणि तोंड बांधून त्यांच्या अंगावरील सहा तोळे सोन्याचे दागिने लुटून चोरटे पाठीमागच्या दारातून पसार झाले. या घटनेची पन्हाळा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

महाडिकवाडी येथे बापू महाडिक (वय ९०)आणि इंदुबाई बापू महाडिक (वय ८०) येथे राहतात. शनिवारी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास बापू महाडिक रात्री लघुशंकेला उठले. त्यावेळी दरवाजा उघडा असतो. त्यांना ऐकू कमी येते, याची माहिती घेऊन चोरी झाली असल्याची चर्चा घटनास्थळी सुरू आहे. चोरटे पाठीमागच्या दरवाजातून बाहेर पडून गल्लीतून मुख्य रस्त्यावरून पसार झाल्याचं समोर आलं. ६ तोळे दागिने चोरट्यांनी केले लंपास- महाडिक दाम्पत्याचा मुलगा सरदार शिक्षक असल्यानं बाहेरगावी राहतात. शनिवारी मध्यरात्री बापू महाडिक लघुशंकेला गेले होते. याचवेळी चोरटे पुढील दरवाजातून घरात शिरले. मधल्या खोलीत झोपलेल्या पत्नी इंदूबाई यांना चोरट्यांनी झोपेच्या अवस्थेत असताना त्यांचे तोंड आणि हातपाय बांधून अंगावरील सहा तोळे सोन्याचे दागिने हिसकावले. यामध्ये ४ तोळ्याच्या पाटल्या, मंगळसूत्र, जुवा किस, बुगड्या, कुड्या असा एकूण ६ तोळ्यांचा ऐवज दोघा चोरट्यांनी लंपास केला असल्याची तक्रार सरदार महाडिक यांनी पन्हाळा पोलीस ठाण्यात दिली आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याच पोलीस निरीक्षक निगाप्पा चोखंडे यांनी सांगितलं.

## प्रत्येक मंत्र्याने राजीनामा द्यायचा का?; गिरीश महाजन संतप्त

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**जळगाव :** पाळधी ते तरसोद बायपास महामार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाचा भराव खचल्याने गेल्या काही दिवसांपासून अवजड वाहतूक जळगाव शहरातून वळिवण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील वाहतुकीवरील ताण वाढला असून दुर्घटनांमध्ये अनेकांना जीव गमवावा लागल्याने उड्डाणपुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घटना घडून अनेक दिवस उलटूनही उड्डाणपुलाची दुरुस्ती पूर्ण न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

दरम्यान बायपासवरील उड्डाणपुलाच्या भरावाची झालेली दुरवस्था आणि दुरुस्तीला लागणारा विलंब याबाबत पत्रकारांनी राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांना प्रश्न विचारला. त्यावर महाजन यांनी, ''प्रत्येक मंत्र्याने आता राजीनामा द्यायचा का?'' असा प्रतिप्रश्न करत आपली भूमिका स्पष्ट केली. या प्रकरणात संबंधित कंत्राटदाराविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.



अवजड वाहनांचा शहरात वाढला भार

पाळधी ते तरसोद बायपास हा जळगाव शहरातील वाहतुकीचा महत्त्वाचा पर्यायी मार्ग मानला जातो. मात्र रेल्वे उड्डाणपुलाच्या भरावाला तडे जाऊन तो खचल्याने या मार्गावरील अवजड वाहतूक शहराच्या दिशेने वळिवण्यात आली. परिणामी शहरातील प्रमुख रस्त्यांवर ट्रक, कंटेनर आणि इतर अवजड वाहनांची संख्या वाढली आहे. वाहतूक कोंडीसोबतच अपघाताचा धोका वाढल्याची चिंता नागरिकांकडून व्यक्त होत आहे. बायपासवर उड्डाणपुलाच्या भरावाची समस्या निर्माण झाल्यानंतर तातडीने दुरुस्ती करून वाहतूक पूर्ववत करणे अपेक्षित होते. मात्र अनेक दिवस उलटूनही काम पूर्ण झालेले नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यानच्या काळात वाहतूक व्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडत असून, शहरातील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

''कंत्राटदारावर गुन्हा दाखल केला आहे''

पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना गिरीश महाजन यांनी या प्रकरणात संबंधित कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे केवळ प्रशासकीय पातळीवर चौकशी न करता कामातील त्रुटी आणि त्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. उड्डाणपुलाच्या बांधकामाची गुणवत्ता, भरावासाठी वापरण्यात आलेले साहित्य, कामाची तपासणी आणि देखभालीची जबाबदारी याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. वारंवार होणाऱ्या दुर्घटना आणि त्यानंतर उद्भवणाऱ्या वाहतूक समस्यांमुळे संबंधित यंत्रणांनी केवळ तात्पुरती डागडुजी न करता कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

महाजनांच्या वक्तव्याने चर्चेला उधाण

दरम्यान, उड्डाणपुलाच्या दुरवस्थेबाबत विचारलेल्या प्रश्नावर ''प्रत्येक मंत्र्याने आता राजीनामा द्यायचा का?'' असे महाजन यांनी केलेले वक्तव्य राजकीय वतुर्ळात चर्चेचा विषय ठरले आहे. एकीकडे दुर्घटनांमध्ये नागरिकांचा जीव जात असताना दुसरीकडे पायाभूत सुविधांची दुरुस्ती रखडत असल्याने प्रशासनाने जबाबदारी निश्चित करून काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. उड्डाणपुलाच्या बांधकामाची गुणवत्ता, भरावासाठी वापरण्यात आलेले साहित्य, कामाची तपासणी आणि देखभालीची जबाबदारी याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## जादूटोण्याच्या संशयातून सासऱ्याने केली सुनेची हत्या, सासऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न, नागपुरात खळबळ

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**नागपूर :** मुलाच्या मृत्यूला सुनेने केलेला जादूटोणा कारणीभूत असल्याचा संशय मनात बाळगून सासऱ्याने सुनेवर कुऱ्हाडीने हल्ला करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना नागपुरात घडली. हत्येनंतर आरोपी सासऱ्यानेही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनी त्यांना विहिरीबाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिवळी नदी परिसरातील पाहुणे ले-आऊट येथे ही घटना घडली. लक्ष्मी रविशंकर पाली (वय ४२) असं हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे, तर नथुलाल भगवान पाली (वय ७०) असे तिच्या सासऱ्याचे नाव असून, त्याच्यावर हत्येचा संशय आहे.

लक्ष्मी यांच्या पतीचे २०१९ मध्ये निधन झाले होते. त्यानंतर नथुलाल यांच्या मनात मुलाच्या मृत्यूबाबत सुनेविषयी संशय निर्माण झाला होता. लक्ष्मी यांनी मुलावर जादूटोणा केल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा संशय नथुलाल घेत होते. याच कारणावरून सासरा आणि सुनेमध्ये अनेकदा वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे. दोघांमध्ये पुन्हा याच मुद्द्यावरून वाद झाला. वादाचे रूपांतर अचानक हिंसक घटनेत झाले. नथुलाल यांनी घरातील कुऱ्हाडीने लक्ष्मी यांच्या डोक्यावर वार केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या लक्ष्मी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

नथुलाल यांनी घेतली विहिरीत उडी - सुनेची हत्या केल्यानंतर नथुलाल यांनी जवळच असलेल्या विहिरीत उडी घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही बाब परिसरातील नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने मदत करत नथुलाल यांना विहिरीतून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी नागपूरच्या मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

पोलिसांचा तपास सुरू - घटनेची माहिती मिळताच यशोधरानगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

## उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी यांनी सहकुटुंब घेतलं साईसमाधीचे दर्शन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी मुख्य न्यायमूर्ती पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सहकुटुंब शिर्डी येथे भेट देत साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. यावेळी त्यांनी साईबाबांच्या समाधीवर निळ्या रंगाची चादर अर्पण करून विधिवत पाद्यपूजा केली. तसेच सहकुटुंब 'शिर्डी माझे पंढरपूर' ही साईबाबांची छोटी आरती करत साईचरणी नतमस्तक होऊन प्रार्थना केली.

मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी यांच्या सहकुटुंब शिर्डी भेटीदरम्यान साईबाबा संस्थानकडून आदरपूर्वक स्वागत करण्यात आलं. त्यांनी सहकुटुंब साईबाबांच्या समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतलं. यावेळी साईबाबांच्या समाधीवर श्रद्धापूर्वक चादर अर्पण करण्यात आली. त्यानंतर विधिवत पाद्यपूजा करण्यात आली. साईबाबांच्या चरणी माथा टेकवत त्यांनी कुटुंबीयांसह मनोभावे प्रार्थना केली. साईदर्शनानंतर साईबाबा संस्थानच्या वतीनं मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी यांचा साईबाबांची मूर्ती आणि शाल देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. साईबाबा संस्थानच्या तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांनी मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी यांचे स्वागत केले. त्यांना शाल आणि साईबाबांची मूर्ती देऊन सन्मान केला.

याप्रसंगी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्यासह संस्थानचे अधिकारी उपस्थित होते. साईबाबा संस्थानचा कारभार न्यायालयानं नियुक्त केलेल्या समितीमार्फत पाहिला जात असल्यानं मुख्य न्यायमूर्तींच्या शिर्डी भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झालं. मुख्य न्यायमूर्ती त्रिपाठी यांना साईबाबा संस्थानकडून भाविकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध सेवाभावी योजनांची माहिती देण्यात आली.

## आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्कच्या विकास उपक्रमांना राज्य शासनाचे पूर्ण सहकार्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्क महाराष्ट्रात राबवत असलेल्या आरोग्य, शिक्षण, आदिवासी विकास, कौशल्यविकास आणि हवामान बदल प्रतिबंधासंदर्भातील उपक्रमांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले. तसेच, अशा सर्व प्रकल्पांना राज्य शासनाकडून आवश्यक ते सहकार्य आणि पाठबळ दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पाचवे आगा खान म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच महाराष्ट्राच्या अधिकृत दौऱ्यावर आलेले प्रिन्स रहीम आगा खान यांनी शिष्टमंडळासह मुख्यमंत्री फडणवीस यांची येथील फेअरमाँट हॉटेलमध्ये भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या वतीने त्यांचे स्वागत केले. विविध सामाजिक विकास प्रकल्प, आरोग्य सुविधा, हवामान कृती, जलव्यवस्थापन, वारसा संवर्धन आणि सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत यावेळी सविस्तर चर्चा झाली. कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार अमीन पटेल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी तथा सचिव डॉ. राजेश गवांदे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील ग्रामीण भागात जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनासाठी आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्कने केलेल्या कार्याचे कौतुक केले. जलटंचाईग्रस्त भागांमध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे गावांमध्ये झालेला सकारात्मक बदल उल्लेखनीय असल्याचे सांगत, अशा प्रकल्पांचा विस्तार अधिक मोठ्या क्षेत्रात करण्यासाठी राज्य शासन भागीदारी करण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणाऱ्या उपक्रमांना शासनाचे पूर्ण सहकार्य राहील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी राज्य शासन आणि आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्क यांच्यात सातत्यपूर्ण संवादासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारण्याबाबतही चर्चा झाली. या माध्यमातून विविध प्रकल्पांचा आढावा घेऊन त्यांचा विस्तार करण्यावर दोन्ही बाजूंनी सहमती व्यक्त करण्यात आली. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शहरी उष्णता कमी करण्यासाठी करण्यात आलेल्या अभ्यासाची माहिती शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना दिली. हरित क्षेत्रवाढ, पर्यावरणपूरक नियोजन आणि हवामान कृतीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम राज्यातील शहरांसाठी उपयुक्त ठरतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

बैठकीत प्रस्तावित बालरुग्णालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष जेरियाट्रिक रुग्णालय, पुनर्वसन केंद्र, कौशल्याधारित आरोग्य सेवा प्रशिक्षण तसेच संशोधन सुविधांबाबतही चर्चा झाली. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांच्या सहकार्याने जेरियाट्रिक तज्ज्ञ डॉक्टरांना प्रशिक्षण देण्याच्या प्रस्तावाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वागत केले. वृद्ध लोकसंख्येच्या वाढत्या गरजा लक्षात घेता, अशा विशेष आरोग्य सुविधांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकल्पासंदर्भातील आवश्यक माहिती शासन स्तरावर तत्काळ संकलित करून आवश्यक ते सहकार्य दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यशिवाय, सांस्कृतिक वारसा संवर्धन, ऐतिहासिक स्थळांचे जतन, हरित उपक्रम आणि समुदाय सहभागावर आधारित प्रकल्पांबाबतही चर्चा झाली. महाराष्ट्रात अशा उपक्रमांचा विस्तार करण्यासाठी आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्कने सकारात्मक भूमिका व्यक्त केली. प्रिन्स रहीम आगा खान यांनी महाराष्ट्रातील विविध विकास उपक्रमांमध्ये सहकार्याची संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले. राज्य शासनासोबतच्या भागीदारीतून आरोग्य, पर्यावरण, कौशल्य विकास आणि सामाजिक विकास क्षेत्रातील प्रकल्प अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील नागरिकांच्या हितासाठी नव्या क्षेत्रांमध्येही सहकार्य वाढविण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.



राज्य शासनाच्या वतीने नव्याने स्थापन करण्यात आलेल्या राजशिष्टाचार, थेट परकीय गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि आंतरराष्ट्रीय संपर्क विभागाच्या वतीने आवश्यक तो समन्वय करण्यात आला.